आपलं महानगर
http://www.e-mahanagar.com
February 26, 2010



M 5, Advt.



# मेटचा 'टेक@मेट'

वाणिज्य शाखा असो, कला असो वा विज्ञान शाखा, कॉलेजलाईफ म्हटलं की धम्माल, मस्ती आणि मजा आलीच! मग त्याला आय.टी.चे विद्यार्थी अपवाद कसे ठरतील?

हेच पटवून दिलंय, मुंबई एज्युकेशन ट्रस्ट (एमईटी)च्या इंस्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर सायन्स (आय.सी.एस.)च्या विद्यार्थ्यांनी.

बांद्र्याच्या एम.ई.टी. कॉलेजमध्ये १७ आणि १८ फेब्रुवारी रोजी पार पडला. आय.टी. स्टुडन्ट्सचा 'टेकऽमेट' उत्सव. हा उत्सव सलग ७ वर्ष जल्लोषात साजरा केला जातोय. पण, या वर्षी 'टेकऽमेट'चा डामडौल काही निराळाच होता.

प्रत्येक वर्षी काहीतरी नाविन्यपूर्ण करण्याची जिद्द असणाऱ्या एम.ई.टी. आय.सी. एस.च्या विद्यार्थ्यांनी यंदा टेकऽमेट मध्ये राशीचक्राची संकल्पना साकारली. प्रत्येक राशीच्या गुणदोषांवर आधारित तब्बल १३ इव्हेंटस् आयोजित करण्यात आले. हा उत्सव आय.टी. स्टुडन्ट्ससाठी 'कोडींग अँड डिबगींग', 'वेब डिसाइनींग', 'नेटवर्क सेक्युरिटी' अशा अनेक आय.टी. संबंधीत स्पर्धांची परवणीच ठरला!

इतकंच नव्हे तर, विद्यार्थ्यांच्या आतंरिक कलागुणांना वाव देण्यासाठी फोटोग्राफी, अॅड-मॅड, डीबेट, गेमींग आणि बॉक्स क्रिकेट सारखे फंडू खेळही आयोजित केले गेले! पण, फेस्टचं खरं आकर्षण ठरला 'दलाल स्ट्रीट' हा इव्हेंट! या व्हर्च्युअल स्टॉक एक्स्चेंजला स्पर्धकांचा प्रचंड रिस्पॉन्स आला! यावर अधिक माहिती देताना द्वितीय वर्ष, एम.सी.ए.चा बलवंत देसाई म्हणतो, 'सुमारे ३८ कॉलेजेसमधून ५०० च्या वर विद्यार्थ्यांनी टेकऽमेटमध्ये भाग घेतला. त्यातील ठाकुर कॉलेज, एस.आई.ई.एस, एस.एन.डी.टी आणि एस.पी. जैन या चार कॉलेजेसच्या विद्यार्थ्यांचा सर्वाधिक सहभाग होता. इतका चांगला रिस्पॉन्स म्हणजे आमच्या मेहनतीची पोचपावतीच म्हणायला हवी!' या उत्सवाचला ढेकणे (असो. डिरेक्टर, भाभा अॅटोमिक रिसर्च सेंटर) आणि डॉ. नागार्जुन जी. (सिनीयर सायंटिस्ट आणि प्राध्यापक) सारख्या मान्यवरांची आणि नामांकित वैज्ञानिकांची उपस्थिती लाभली.

पुस्तकी कीडे मानल्या जाणाऱ्या आय.टी. विद्यार्थ्यांची कल्पकता आणि उत्साह टेकऽमेटमध्ये मात्र सळसळत होता! तरूणाई आणि ज्ञानाची परिपक्वता यांचा समतोल साधत एम.ई.टी.चा टेकऽमेट मोठ्या दिमाखात पार पडला.

**प्रियांका सुर्वे**
leopiya@gmail.com